# सावित्रीबाई फुले जयंती साजरी

स्थानिक खडकी येथील श्री धाबेकर कला महाविद्यालय येथे शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. लोहकपूरे  यांच्या अध्यक्षतेखाली स्त्री शिक्षणाच्या जनक श्रीमती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी समाज शास्त्र विभाग प्रमुख डॉ. अमरीश गावंडे व प्रा. स्वाती फाले हे उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवताना जनतेच्या प्रचंड रोशाला बळी पडून प्रसंगी अंगावर शेण माती झेलून न डगमगता कार्य सुरूच ठेवले. यासाठी महात्मा फुले यांची खंबीर साथ त्यांना लाभली. काहीही करून मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणावयाचा आहे असा संकल्प करून होणाऱ्या त्यांच्या त्याग वअपमान दुःख यांची विस्तृत माहिती डॉ. लोहकपूरे यांनी दिली.

आपल्या प्रमुख मार्गदर्शनात सांगताना डॉ.अमरीश गावंडे यांनी सावित्रीबाई यांच्या कर्तव्याला मुजरा करून त्यांनी केलेल्या अपार कष्टाचे आज महिला भगिनींनी आपल्या विविध क्षेत्रात जी छाप उमटवून सिद्ध केले. त्यांचे स्वर्गीय इंदिरा गांधी, मदर टेरेसा, कल्पना चावला, अर्थमंत्री निर्मलासिता  रमण, किरण बेदी, इतर अनेक उदाहरणे देऊन सांगितले.

प्रा. फाले यांनी सावित्रीबाई यांचा जीवनपट थोडक्यात सांगितला याप्रसंगी महाविद्यालय विद्यार्थी व विद्यार्थिनी शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.